प्रकरण दुसरे

# मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्थूल आढावा

प्रकरण दुसरे

# मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्थूल आढावा


२.१ प्रस्तावना

२.२ मराठी कादंबरीचा उदय

२.३ कादंबरीची व्याख्या

२.४ कादंबरीचे घटक

२.५ मराठी कादंबरीतील नवे प्रवाह

२.६ मराठी चरित्रात्मक कादंबरी

२.६.१ चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी

२.६.२ मराठी संत चरित्रात्मक कादंबरी

२.७ समारोप

संदर्भ

प्रकरण दुसरे

# मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्थूल आढावा

## २.१ प्रस्तावना :

१९ व्या शतकात मराठी साहित्यात इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून कथा, काव्य, नाटक, निबंध या वाङ्मयप्रकाराबरोबरच कादंबरी हा वाङ्मयप्रकार उदयास आला आणि हाच वाङ्मयप्रकार पुढे मराठी साहित्य समृद्ध करण्यास उपयुक्त ठरला. कादंबरी हा वाङ्मयप्रकार जीवनप्रवाहाबरोबर बदलत जाणारा साहित्यप्रकार आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी कादंबरीच्या क्षेत्रात ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, सामाजिक, चरित्रात्मक इत्यादी नवे प्रवाह निर्माण झाले. नवनवीन मार्ग स्वीकारून मराठी कादंबरी पुढे जाऊ लागली. मराठीतील चरित्रात्मक कादंबरीचा स्थूल आढावा प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

## २.२ मराठी कादंबरीचा उदय :

कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा उदय इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून झाला आहे. या वाङ्मयप्रकाराचा उल्लेख इंग्रजीमध्ये 'नॉव्हेल' (novel) असा केला जातो. मराठीमध्ये 'नावल' हा शब्द त्यासाठी वापरण्याचा प्रयत्न झाला. पण तो रूढ झाला नाही. बाणभट्टाची 'कादंबरी' हाच शब्द पुढे रूढ झाला. हरी केशवजी यांनी बन्यनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस'चे भाषांतर 'यात्रिक क्रमण' या नावाने केले. मराटीतील हीच पहिली भाषांतरीत कादंबरी होय. मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून बाबा पदमनजी यांच्या 'यमुनापर्यटन'चा उल्लेख केला जातो. ही मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी होय. त्यानंतर लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्‌भूतरम्य कादंबरी १८६१ साली प्रसिद्ध झाली. तर १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांनी 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली. हीच मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी समजली जाते. ही कादंबरी शिवकालाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे.

## २.३ कादंबरीची व्याख्या :

मराठी साहित्यात 'कादंबरी' हे नाव सर्वांना परिचित आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप कथा, कविता, नाटक, चरित्र, प्रवासवर्णन इत्यादी पेक्षा वेगळे आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची इतर वाङ्मयाप्रमाणे व्याख्या करणे शक्य नाही. परंतु कादंबरीच्या बदलत्या स्वरूपानुसार काही लेखकांनी केलेल्या व्याख्या आहेत त्या पुढीलप्रमाणे,

१) जान्हवी संत : "कादंबरीला व्याख्येत बांधणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे अवघड कार्य आहे. हे मान्य करावे लागले."[१]

२) मा. का. देशपांडे : "कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य-चित्र होय".[२]

३) श्री. मा. कुलकर्णी : "कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगद्य-कथा म्हणजे कादंबरी", असे म्हणतात".[३]

४) मराठी विश्वकोश : "कादंबरी म्हणजे एक दीर्घ गद्य साहित्यप्रकार".[४]

५) जे. बी. प्रिस्टले : "मानवी जीवनाचा आरसा म्हणजे कादंबरी होय".[५]

६) डेव्हिड सिसिल : "जीवन जगताचा परिचय करून देणारी कला".[६]

७) हेन्री जेम्स : "कादंबरी म्हणजे वैयक्तिक जीवनानुभूती होय".[७]

८) भालचंद्र नेमाडे : "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयाचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेली अशी साहित्यकृती असते".[८]

९) श्री. ना. पेंडसे : "कादंबरी म्हणजे जीवनप्रवाहाचा सलग स्वयंपूर्ण छेद असतो".[९]

अशाप्रकारे कादंबरीच्या व्याख्या अनेक अभ्यासकांनी केलेल्या आहेत. या सर्वांच्यापेक्षा जान्हवी संत यांनी केलेली व्याख्या योग्य वाटते. त्या म्हणतात, "मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी एक ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी".[१०]

## २.४ कादंबरीचे घटक :

कादंबरी हा वाङ्मयप्रकार जीवन प्रवाहाबरोबर चालणारा व बदलत जाणारा साहित्य प्रकार आहे. कादंबरीची निश्चित अशी व्याख्या नसली तरी तिचे घटक मात्र निश्चित सांगता येतात. कादंबरीचे घटक सर्व कादंबरीमध्ये आढळतात. आज कादंबरीचे स्वरूप वेगळ्या प्रकारचे असले तरी तिच्या घटकात मात्र बदल झालेला नाही. कादंबरीत कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, भाषा हेच चार प्रमुख घटक महत्त्वाचे असतात.

### १. कथानक :

कथानक हा कादंबरीचा गाभा असतो. कथा ही आशयाच्या दृष्टीने लहान असते तर कादंबरी ही विस्तृत असते. कथानकात प्रारंभ, मध्य आणि शेवट अशा तीन अवस्था असतात. घटनेच्या निश्चित कारणामुळेच कथानक फुलते. उदा. 'राजा मेला आणि नंतर राणी मेली' ही गोष्ट झाली. याला कथानक म्हणता येपार नाही. पण जर 'राजा मेला आणि दुःखाने राणी मेली' असा कार्यकारणभाव असेल तर ते कथानक होते. कथानकाचा शेवटही स्वाभाविकच व्हायला हवा.

### २. व्यक्तिरेखा :

हा कादंबरीचा दुसरा मुख्य घटक होय. कादंबरीला कथानकांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे पात्रांचीही आवश्यकता असते. कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रेच करीत असतात. प्रत्येक कलाकृतीच्या केंद्रस्थानी 'मागूसच' असतो. त्यामुळे समाजातील वास्तव घटना माणसांच्या कृतीद्वारेच घडविल्या जातात. लेखक कथानकाला अनुसरून व आवश्यक त्या पात्रांची निवड कादंबरीमध्ये करीत असतो. कादंबरीत पात्रांची संख्या निश्चित नसल्यामुळे पात्रे कितीही असू शकतात. कादंबरीतील प्रत्येक पात्राचा स्वभाव, गुणविशेष, वागण्याची, बोलण्याची पद्धती यासर्व गोष्टीमध्ये वेगळेपण असते. कादंबरीमध्ये मानवी, अमानवी पात्राप्रमाणेच 'यंत्र' हे पात्र असू शकते. तसेच मुख्य पात्रे, गौण पात्रे व पुरक पात्रे असे वर्गीकरण केले जाते. अशाप्रकारे कादंबरीत प्रत्येक पात्र महत्त्वाचे असते.

**३. वातावरण :**

कादंबरीमध्ये वातावरण हा घटक गौण मानला असला तरी त्यांचे कादंबरीतील स्थान महत्त्वाचे आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार मानवी जीवनाशी निगडित असल्याने त्याची व्याप्ती अधिक असते. समाज, व्यक्ती व त्यांचे जीवन या घटकांचा परस्पर संबंध कादंबरीत येतो. कादंबरीमध्ये वास्तवता निर्माण होण्यासाठी स्थलकालाची निर्मिती केली जाते. कथानकप्रधान कादंबऱ्यामध्ये 'वातावरण' या घटकास जास्त महत्त्व असते. प्रत्येक कादंबरीचे कथानक हे कोणत्या ना कोणत्या तरी वातावरणात घडते. कादंबरीमध्ये निर्माण केलेले वातावरण हे वास्तव नसते तर ते आभासात्मक असते. कादंबरीमध्ये जे कथानक निर्माण केले जाते त्याला वातावरणनिर्मितीची आवश्यकता असते. भौगोलिक, सामाजिक, मानसिक, पौराणिक, ऐतिहासिक इत्यादी प्रकारे वातावरणाचे वर्गीकरण करता येते.

**४. भाषाशैली :**

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा ही सतत प्रवाही असल्याने ती व्यक्तिपरत्वे, स्थानपरत्वे व जातीजमातीनुसार बदलते. तसेच आपण भाषेमुळे भूतकालीन व भविष्यकालीन घटना सांगू शकतो. कादंबरीची भाषा ही निवेदने, वर्णने, संवाद इत्यादी घटकांनी तयार होत असते. नागरी व ग्रामीण या दोन्ही प्रकारच्या कादंबरीतील भाषेमध्ये थोडा फरक असतो. कादंबरीमध्ये घटना, संवाद, वर्णन, प्रसंग इत्यादीची रचना भाषेद्वारेच केली जाते. तसेच कादंबरीमध्ये भाषा ही आशयसूत्राला अनुसरून वापरली जाते.

अशाप्रकारे कादंबरीमध्ये कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण व भाषाशैली हे महत्त्वाचे घटक असतात. या चार घटकांमुळेच कादंबरीचा आकृतिबंध तयार होत असतो. कादंबरीच्या घटकांचा आढावा घेतल्यानंतर स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीमध्ये कोणकोणते नवीन प्रवाह उदयास आले यांचा विचार करणे उचित ठरावे.

**२.५ मराठी कादंबरीतील नवे प्रवाह :**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीत अनेक नवनवे प्रवाह निर्माण झाले. मानवाच्या ज्ञानात व अनुभवाच्या कक्षेमध्ये झालेल्या प्रगतीमुळे कादंबरीचे अनेक प्रवाह उदयास आले. कादंबरीमधील काही जुन्या प्रवाहांमध्ये बदल होऊन काही नवीन प्रवाह निर्माण झालेले

आहेत. मराठी कादंबरीमध्ये पौराणिक, ग्रामीण, दलित, प्रादेशिक, ऐतिहासिक, राजकीय, चरित्रात्मक कादंबरी इत्यादी नवे प्रवाह अस्तित्वात आलेले आहेत. या सर्व प्रवाहांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**१) ग्रामीण कादंबरी :**

स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे ग्रामीण कादंबरी हा होय. ग्रामीण भागातील निसर्ग, सुख, दुःख, जनजीवन, ताणतणाव, हेवेदावे, कृषिजीवन इत्यादी विषय ग्रामीण कादंबऱ्यांचे बलस्थान ठरले. तसेच खेड्यातील शेतकरी व मजूरांकडे लक्ष वेधले गेले, तर खरा महाराष्ट्र हा शहरात नसून खेड्यात आहे यांची जाणीव कादंबरीकाराला झाली. रा. वि. टिकेकर ऊर्फ धनुर्धारी यांनी १९०३ साली 'पिराजी पाटील' ही ग्रामीण कादंबरी लिहिली. ती मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. त्यानंतर पुढे र. वा. दिघे (पाणकळा), ग. ल. ठोकळ (गावगुंड), उद्धव शेळके (धग), शंकर पाटील (टारफुला), आनंद यादव (गोतावळा), महादेव मोरे (झोंबड) इत्यादी कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. ग्रामीण भागातील तरुण पिढीने शिक्षण घेतल्यामुळे व त्यांना आपल्या सभोवतालच्या ग्रामीण जीवनातून आलेल्या अनुभवामुळे ग्रामीण कादंबरी निर्माण झाली.

**२) प्रादेशिक कादंबरी :**

साठोत्तरी प्रवाहातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे 'प्रादेशिक कादंबरी' हा होय. भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, रचना, परंपरा, सामूहिकता, लोकसंस्कृती, चालीरीती, जीवनाचे दर्शन, भाषा इत्यादी घटकांचे चित्रण प्रादेशिक कादंबरीमध्ये रेखाटले जाते. प्रादेशिक कादंबरीमध्ये विशिष्ट प्रदेशातील जीवनरीतीच्या चित्रणाला व निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे. तसेच तेथील समाज ग्रामीण जीवन जगणारा व बोली भाषेत बोलणारा असतो. "एखाद्या विशिष्ट प्रदेशाला किंवा टापूला कादंबरीची पार्श्वभूमी घेऊन कथानक लिहिले जाते तेव्हा तिला 'प्रादेशिक कादंबरी' म्हणतात. "[११] अशी व्याख्या संत जान्हवी यांनी प्रादेशिक कादंबरीची केली आहे. प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी यांच्या घटकांमध्ये अत्यल्प फरक असल्याचे दिसते. थॉमस हॉर्डी हे इंग्रजीतील पहिले थोर प्रादेशिक

कादंबरीकार आहेत. तर र. वा. दिघे हे मराठीतील पहिले प्रादेशिक कादंबरीकार असून त्यांनी 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या!' इत्यादी कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यानंतर श्री. ना. पेंडसे (गारंबीचा बापू), उद्धव शेळके (धग), खानोलकर (गणूराया आणि चानी) इत्यादींच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. प्रादेशिक कादंबरी ही वास्तवदर्शी कादंबरी असते.

**३) ऐतिहासिक कादंबरी :**

मराठी कादंबरीतील ऐतिहासिक कादंबरी हा एक प्रवाह आहे. कादंबरीकार लेखन करताना व्यक्तिप्रधानतेवर भर देतात. ऐतिहासिक कादंबरीमध्ये केवळ इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला जात नाही तर इतिहासातील व्यक्तीचे 'माणूस' म्हणून दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला जातो. कादंबरीकार शिवकाल, पेशवेकाल, अव्वल इंग्रजी कालखंड ऐतिहासिक कादंबरीच्या लेखनासाठी निवडतात. रा. भि. गुंजीकरांनी १८७१ साली 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहिली. तर ऐतिहासिक कादंबरीच्या लेखनाची खरी सुरुवात हरी नारायण आपटे यांच्या 'उषःकाल' (१८९५) या कादंबरीपासून झाली. लेखक इतिहासातील घटना व भूतकाळातील प्रसिद्ध व्यक्ती समोर ठेऊन या कादंबरीचे लेखन करतो. रणजित देसाई (श्रीमानयोगी), शिवाजी सावंत (छावा), गो. नी. दांडेकर (हर हर महादेव), ना. स. इनामदार (झेप) इत्यादी लेखकांनी ऐतिहासिक कादंबरीचे लेखन केले.

**४. सामाजिक कादंबरी :**

सामाजिक कादंबरीचा हा प्रवाह इ.स. १९६० नंतर उदयास आला. स्वातंत्र्योत्तर काळात समाजात परिवर्तन झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. मध्यमवर्गीयांच्या समस्या, बेकारी, अज्ञान, सुख-दुःख, वेदना, दारिद्र्य, अंधश्रद्धा इत्यादी समस्याचे वर्णन कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला. समाजाचे वास्तव दर्शन घडविणे हे साहित्याचे प्रयोजन मानले जाते. बाबा पदमनजी यांची 'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिली सामाज्कि कादंबरी मानली जाते. हरिभाऊनी त्या काळच्या समाजाचे दर्शन आपल्या कादंबऱ्यातून घडवून एक आदर्श निर्माण केला होता. त्याचप्रमाणे पुढे 'बळी', 'सूड', 'चक्र', 'बारी', 'हातभट्टी' इत्यादी सामाजिक कादंबरीतून समाजाचे दर्शन घडविले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठीत अनेक सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

### ५) राजकीय कादंबरी :

मराठी कादंबरीतील हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. समकालीन राजकीय परिस्थितीवर आधारित कथानक तयार करून या कादंबरीची रचना केली जाते. एखाद्या देशाच्या समाज जीवनाइतकेच राजकीय जीवनाला महत्त्व असते. मराठीतील पहिली राजकीय कादंबरी म्हणून दत्तो आण्णाजी तुळजापूरकर यांची 'माझे रामायण' (१९२७) या कादंबरीचा उल्लेख बापट व गोडबोले यांच्या 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास' या पुस्तकात केला आहे. परंतु या कादंबरीच्या बाबतीत काही मतभेद असल्यामुळे माडखोलकर यांची 'मुक्तात्मा' (१९३३) ही मराठीतील पहिली उत्कृष्ट राजकीय कादंबरी म्हणता येईल. सावरकरांची 'पाणी', वरेरकर यांची 'धावता धोटा', खांडेकरांची 'दोन ध्रुव', 'उल्का', 'शाप' इत्यादी कादंबऱ्या राजकीय विषयावर लिहिलेल्या आहेत. ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड'ही राजकीय कादंबरी अस्तित्वात आली. त्यानंतर पुढे अनेक राजकीय कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या असून आज मराठीत हा प्रवाह बराच समृद्ध झालेला दिसत आहे.

थोडक्यात स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीत अनेक नवनवे प्रवाह निर्माण झालेले आहेत. या सर्वच प्रवाहांचा आढावा घेण्याची आवश्यकता नसल्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने काही प्रवाहांचा उल्लेख येथे केलेला आहे. तसेच यानंतर 'मराठीतील चरित्रात्मक कादंबरी' या प्रवाहांचा विचार करणे उचित ठरावे.

### २.६ मराठी चरित्रात्मक कादंबरी :

मराठी साहित्यातील इतर प्रवाहाप्रमाणेच 'चरित्रात्मक कादंबरी' हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. चरित्रात्मक कादंबरी खऱ्या अर्थाने विसाव्या शतकातील सातव्या दशकात उदयास आली चरित्रात्मक कादंबरी हे चरित्र आणि कादंबरी यांचे मिश्रण आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय इ. क्षेत्रात उत्तुंग असे कार्य केलेल्या व्यक्तींच्या जीवनचरित्रावर ही कादंबरी लिहिली जाते. ऐतिहासिक कादंबरीप्रमाणेच चरित्रात्मक कादंबरीतही चरित्रनायकाचे जीवनचित्र रेखाटले जाते. चरित्रात्मक कादंबरी आणि ऐतिहासिक कादंबरी यांच्या घटकांमध्ये मूलभूत फरक असल्याचे दिसते. या संदर्भात डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणतात, ''चरित्रात्मक कादंबरीकाराला चरित्रनायकाच्या जीवनेतिहासाचे

संपूर्ण ज्ञान असूनही त्याचे केवळ निवेदन, कलात्मक निवेदन करणे हे त्याचे कार्य नसते. तो आपल्या लेखनाद्वारे चरित्रनायकाच्या जीवनाचा भावनात्मक प्रत्यय घडवीत असतो. एवढेच नाही, तर कादंबरीतील पात्रांचा व्यक्तित्व विकास दाखविण्यासाठी काल्पनिक पात्रे, प्रसंग निर्माण करून इतिहासाला बाधा येऊ न देता हे कार्य कादंबरी लेखक करीत असतो''.[१२] पौराणिक व ऐतिहासिक कादंबरीपेक्षा चरित्रात्मक कादंबरी ही वास्तव आहे. कारण चरित्रलेखनासाठी आवश्यक ते पुरावे उपलब्ध असतात.

पौराणिक व ऐतिहासिक कादंबरी लेखकाप्रमाणे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य चरित्रात्मक कादंबरी लेखकाला घेता येत नाही. या संदर्भात प्रल्हाद वडेर म्हणतात, ''ऐतिहासिक कादंबऱ्या या बहुधा चरित्रनायकाभोवतीच घोटाळ्याचे कारण म्हणजे तत्कालीन लोक व समाज या संदर्भातील तपशिलाचा अभाव. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरीच्या लेखकाला जे स्वातंत्र्य ते चरित्रपर कादंबरीला मिळत नाही''.[१३]

कादंबरी हा वाङ्मयप्रकार व्यक्तित्वप्रधान आहे. विशिष्ट समाज, त्या समाजातील व्यक्ती आणि तिचे चरित्र हाच कादंबरीचा कणा असतो. त्यामुळे लेखकाला एकाच वेळी संशोधन व सृजन या दोन्हीचा विचार करून चरित्रात्मक कादंबरीचे लेखन करावे लागते.

चरित्रात्मक कादंबरीबाबत प्रा. केशव मेश्राम यांचे मत विचारात घेण्याजोगे आहे. ''चरित्रात्मक कादंबरीच्या सामर्थ्याची व मर्यादांची चर्चा न करताही त्याबद्दल एक सामान्य विधान करता येते आणि ते म्हणजे ज्या व्यक्तीचे चरित्र लेखकाने कादंबरीचे कथावस्तू बनविलेले असते. ती व्यक्ती निर्विवादपणे 'चरित्रनायक' होण्यास पात्र असली पाहिजे. त्या व्यक्तीच्या नामोल्लेखाबरोबर ती भाषा बोलणारे, त्या मातीत वावरणारे, व त्या देशाचा सार्थ अभिमानाने उल्लेख करणाऱ्या प्रत्येकाला तो 'माणूस' माहित असणें आवश्यक असावे लागते. 'माहित असणे' ह्या शब्दाचा अर्थ असा नव्हे, की त्याचा जन्म कुठल्या वारी, दिवशी, तिथीला, कोणत्या जातीत झाला हे ठाऊक असणे! पण हा माणूस 'मोठा' होता. विविद्य होता त्याचा उल्लेखनीय वाटा आहे एवढे जरी स्मरले तरी पुष्कळ झाले.''[१४]

लेखकांनी पुराणातील, इतिहासातील व्यक्ती निवडून व भूतकाळातील प्रेरणा घेऊन त्यांची जीवनचरित्रे रेखाटली. त्यातूनच चरित्रात्मक कादंबरीच्या ऐतिहासिक, पौराणिक, संतचरित्रपर अशा शाखा निर्माण झाल्या.

**२.६.१ चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी :**

ही चरित्रात्मक कादंबरीची एक शाखा निर्माण झाली असून ती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आली. मराठीतील अनेक चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबऱ्या या व्यक्तित्वप्रधान आहेत. अर्वाचीन काळातील चरित्रात्मक कादंबरीचा प्रारंभ डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या 'हरिनारायण' या कादंबरीने झाला. असा उल्लेख श्यामा घोणसे यांच्या 'मराठी संतचरित्रात्मक कादंबरी : एक मानदंड' या पुस्तकात केला आहे. पण खऱ्या अर्थाने श्री. ज. जोशी यांची 'आनंदी-गोपाळ' (१९६८) ही चरित्रात्मक कादंबरी मराठी वाङ्मयात लोकप्रिय ठरली आणि त्यानंतर अनेक चरित्रपर कादंबऱ्या प्रसिद्ध होऊ लागल्या.

'आनंदी-गोपाळ' ही कादंबरी गोपाळराव जोशी व आनंदीबाई जोशी यांच्या जीवनचरित्रावर आधारित आहे. लेखकाने या कादंबरीचे लेखन करण्यापूर्वी आनंदीबाईंचे करुणाजनक जीवन चरित्र वाचले होते. त्यांनी कादंबरीचे कथानक आनंदीबाईभोवती गुंफलेले आहे. विवाह समयी गोपाळरावाचे वय एकोणतीस वर्षे व आनंदी बाईचे वय नऊ वर्षे होते. पुढे गोपाळराव प्रतिकूल परिस्थितीत आपल्या पत्नीला अमेरिकेला पाठवितात. त्यांनी तिच्या बुद्धीमत्तेचा विचार केल्यामुळेच त्या डॉक्टर झाल्या. एवढे शिक्षण घेऊनही त्या गोपाळरावांना घाबरत असत. कारण त्या अल्लड, भोळ्या स्वभावाच्या होत्या. यासंदर्भात रामप्रसाद तौर यांचे मत विचारात घेण्याजोगे आहे, ''आनंदीबाई अमेरिकेतही हिंदुत्व पाळूनच उकडलेले बटाटे खाऊन, कायम पुरुषी अहंकार असलेल्या नवऱ्याच्या धाकाने भेदरलेपण सोडत नाही, सुदैवाने संधी मिळूनही तिचा आत्मविश्वास झाला नाही. म्हणून ती विक्षिप्त अहंकारी नवऱ्याचा बळी ठरली ही तिच्या जीवनाची खरी शोकांतिका आहे. लेखकाला नेमकी ही शोकांतिकाच पकडता आली नाही.''[१५] अशाप्रकारे या कारणामुळेच ही कादंबरी म्हणावे तितके यश संपादन करू शकली नाही. असे म्हणावे लागते.

'दुर्दम्य' ही गंगाधर गाडगीळ यांची द्विखंडात्मक कादंबरी असून ती लो. टिळकांच्या चरित्रावर लिहिली आहे. या कादंबरीत काही उणिवा असल्या तरी चरित्रपर कादंबरी म्हणून 'दुर्दम्य' ला मराठीत तोड नाही. या संदर्भात प्रल्हाद वडेर यांनी मांडलेले मत असे आहे, ''दुर्दम्य' ही मराठीतील एकमेव चरित्रात्मक कादंबरी आहे. असा दावा करण्याचा मोह गाडगीळांना झाला तर त्यात नवल नाही.'' [१६] अशाप्रकारे ते या कादंबरीविषयी आपले मत मांडतात. लो. टिळकांच्याभोवती कादंबरीचे कथानक फिरत राहिल्यामुळे कादंबरीत एककेंद्रीपणा आला असला तरी ही कादंबरी लक्षणीय ठरली.

'युगप्रवर्तक' ही कादंबरी 'हरिभाऊ पगारे' यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर लिहिली आहे. या कादंबरीत बाबासाहेबांच्या जीवनातील संघर्ष, त्यांच्या पत्नीने दिलेला सहवास, लहानपणापासून ते उच्च शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांचा झालेला जीवनप्रवास इत्यादीचा वेध घेण्यात आलेला आहे. तसेच यामध्ये बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन दिसून येते. शालेय जीवनात हरिजन असल्यामुळे अतिशय वाईट वागणूक आंबेडकरांना मिळत होती. तसेच त्यांच्या जीवनाच्या घडणीत सुखाचे-दु:खाचे अनेक प्रसंग या कादंबरीत चित्रित झालेले आहेत. अशाच स्वरूपाची डॉ. आंबेडकरांच्या जीवनचरित्रावर भा.द. खेर यांची 'प्रबुद्ध' व बा.सी. हाटे यांची 'युगंधर' या चरित्रपर कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

'रमाई' ही कादंबरी 'यशवंत मनोहर' यांनी लिहिली असून डॉ. आंबेडकरांच्या पत्नी रमाई यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या आयुष्यात जे घडले ते या कादंबरीत चित्रित केले आहे. रमाईचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. लहानपणीच त्यांच्या आई-वडिलांचा मृत्यू होतो आणि सर्व जबाबदारी रमाईवर पडते. पुढे बाबासाहेबांच्याबरोबर त्यांचा विवाह होतो. रमाई ही एक आदर्श माता, गृहिणी, पत्नी होती.

अशाच प्रकारची 'बंधुमाधव' यांची रमाबाईच्या जीवनावर 'रमाई' ही चरित्रपर कादंबरी प्रकाशित झाली आहे. भा.द. खेर यांनी 'लालबहादूर शास्त्रीच्या' जीवनावर 'अमृतपुत्र' (१९७०) ही चरित्रात्मक कादंबरी लिहिली. यात शास्त्रीजींचा आदर्श,

अन्यायाविरुद्ध लढा, भारत-पाक युद्धांच्या वेळी देशाला दिलेल्या प्रेरणा, त्यांचे जीवन आणि कार्य इत्यादीचे चित्रण या कादंबरीत लेखकाने सविस्तर केलेले आहे.

'साहेब' या चरित्रात्मक कादंबरीमध्ये उद्धव शेळके यांनी आचार्य अत्रेंच्या अष्टपैलू जीवनाचे चित्रण केले आहे. कवी, नाटककार, व्यवसाय, राजकारण, चित्रपट इ. क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा या कादंबरीत घेतला आहे.

रणजित देसाई यांची 'स्वामी' (१९६२) ही चरित्रात्मक कादंबरी प्रकाशित झाली असून थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या घटनावर ही कादंबरी लिहिली आहे. लेखकाने ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे या कादंबरीचे लेखन केले आहे. माधवरावांचे राजकीय कर्तृत्व त्याचं सुख-दुःख, राजकीय वातावरण इत्यादीचे चित्रण या कादंबरीत येते. तसेच या कादंबरीमधून तत्कालीन ऐतिहासिक वातावरण दिसून येते.

'मृत्यूंजय' ही कादंबरी पौराणिक आशय घेऊन शिवाजी सावंत यांनी 'कर्ण' या व्यक्तिरेखेवर लिहिलेली आहे. लेखकाने कर्णाचा उल्लेख 'सूर्यपुत्र' असा वारंवार केला आहे. कर्णाला उपेक्षित जीवन व संघर्षमय जीवन जगावे लागले याचे चित्रण या कादंबरीमध्ये आले आहे.

अशाच पद्धतीची 'राधेय' ही चरित्रपर कादंबरी 'रणजित देसाई' यांनी लिहिली असून ती 'कर्णाच्या' जीवनचरित्रावर आहे. त्यांनी 'कर्ण कथा' जन्मापासून न घेता प्रथम कर्णाचा शेवट व नंतर इतर प्रसंगाचे चित्रण कादंबरीत केले आहे. 'धर्मयुद्ध' ही चरित्रपर कादंबरी डॉ. रवींद्र ठाकूर यांनी लिहिली असून ती 'कर्ण' या व्यक्तिरेखेवर आधारित आहे. या कादंबरीमध्ये 'कर्णाची' शोकांतिका व तो सर्वांकडून कसा उपेक्षित राहिला यांचे चित्रण आलेले आहे. तसेच या कादंबरीत समाजातील भाऊबंदकी व वारसा हक्क यांचे विदारक चित्रणही आलेले आहे. या कादंबरीमध्ये अद्भूतता व चमत्काराला लेखकाने थारा दिलेला नाही. तसेच 'महात्मा फुले' यांच्या जीवनावर त्यांनी 'महात्मा' ही चरित्रपर कादंबरी लिहिली आहे. मा. फुले यांच्या व्यक्तिमत्त्वातील देवत्व व मनुष्यत्व या गुणांचे दर्शन या कादंबरीतून घडते. तसेच त्यांनी अस्पृश्य, स्त्रिया, शेतकरी, शेतमजूर इत्यादींच्या उद्धारासाठी या कादंबरीत केलेल्या कार्याचे वर्णन येते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व मानवता ही मूल्ये

समाजात कशाप्रकारे रुजविता येतील हा विचार त्यांच्या मनात होता. याचे चित्रण या कादंबरीतही आलेले आहे. 'महात्मा' ही कादंबरी इंग्रजी भाषेत भाषांतरीत झाली असून ती खूप लोकप्रिय झाली आहे.

त्यानंतर मराठीत अनेक चरित्रात्मक ऐतिहासिक व पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्यामध्ये हिं.गो. बनसोडे -'आभाळाएवढी' (सावित्रीबाई फुले), अनिरुद्ध पुनर्वसू - 'प्रभंजन' (म. फुले), सुमती क्षेत्रमाडे-'जीवनस्वप्न' (शरच्चंद्र चटर्जी), उद्धव शेळके - 'मन:पूत' (पु.भा. भावे), बाबा भांड-'तंट्या' (तंट्या भिल्ल), विश्वास पाटील - 'महानायक' (सुभाषचंद्र बोस), विठ्ठल वाघ-'डेंबू' (गाडगे महाराज), मधुकर केचे - 'मोती ज्याच्या पोटी' (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज) विद्याधर भागवत 'ऐलतटावर पैलतटावर' (बालकवी) इत्यादी कादंबऱ्यांचा निर्देश करता येईल. पण काही महत्त्वपूर्ण मोजक्याच कादंबऱ्यांचा येथे उल्लेख केला आहे. मराठी चरित्रात्मक कादंबरीच्या ऐतिहासिक व पौराणिक शाखेप्रमाणेच संतचरित्रपर कादंबरीचा विचार करणे उचित ठरावे.

### २.६.२ मराठीतील संतचरित्रात्मक कादंबरी :

स्वातंत्र्योत्तर काळात चरित्रात्मक ऐतिहासिक, पौराणिक कादंबरीप्रमाणेच संतचरित्रात्मक कादंबरी ही शाखा उदयास आली. चरित्रात्मक कादंबरीतील संतचरित्रपर कादंबरी हा एक महत्त्वपूर्ण प्रकार असून या कादंबरीचे संत हे नायक आहेत. समाजातील लोकांचा संताकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा आदराचा, श्रद्धेचा आहे. गो. नी. दांडेकर, भा.द. खेर, पद्माकर गोवईकर, रवींद्र भट, दि.बा. मोकाशी, अरुणा ढेरे इत्यादींनी संतचरित्रपर कादंबऱ्या लिहिलेल्या असून त्या भावपूर्ण आहेत. मध्ययुगीन काळातील संतावर अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.

मराठीत संतचरित्रपर कादंबरी लिहिण्याचे श्रेय 'श्री. रा. ग. कोलांगडे' व 'पाध्ये' यांच्या 'भगवान गौतम बुद्ध' (१९४०) या चरित्र लेखनाकडे जाते. असा उल्लेख श्यामा घोसणे यांच्या 'मराठी संतचरित्रात्मक कादंबरी : एक मानदंड' या पुस्तकात केला आहे. तर आधुनिक संतचरित्रपर कादंबरी लेखनाचे श्रेय 'श्री पद्माकर गोवईकर' यांच्या 'मुंगी उडाली आकाशी (१९७०) या कादंबरीकडे जाते. संत ज्ञानदेवांच्या चरित्रावर लिहिलेली ही पहिली

संतचरित्रपर कादंबरी आहे. श्री. रवींद्र भट यांची 'इंद्रायणीकाठी' (१९७२) ही कादंबरी 'संत ज्ञानदेवांच्या' चरित्रावर आधारित असून या कादंबरीच्या १९९६ पर्यंत अकरा आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. (एक आवृत्ती पाच हजार प्रतींची आहे) या कादंबरीचे 'हिंदी' अनुवाद झाल्याने महाराष्ट्राबाहेरही वितरीत झाली. या कादंबरीच्या प्रसिद्धीनंतर श्री. रवींद्र भट्टांनी 'भेदिले सूर्यमंडळा (१९९०) ही समर्थ रामदासांच्या जीवनावर व 'घास घेई पांडुरंग' (१९९४) ही संत नामदेवाच्या चरित्रावर आधारित कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

दि. बा. मोकाशी यांचे 'आनंद-ओवरी' (१९७४) ही संत तुकाराम यांच्या जीवनाचा वेध घेणारी कादंबरी आहे. तुकारामाचा भाऊ कान्होबाने व्याकुळतेने त्यांचा शोध घेतला हे या कादंबरीतून चित्रित केले आहे.

गो. नी. दांडेकर यांनी ऐतिहासिक कादंबऱ्याप्रमाणेच संतचरित्रपर कादंबऱ्याचे लेखन केले आहे. 'मोगरा फुलला', 'दास डोंगरी राहतो', 'तुका आकाशाएवढा' 'पद्मा', 'जगन्नाथ पंडित', इत्यादी संतचरित्रपर कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. संत ज्ञानदेवांच्या जन्मसप्तशतीचे निमित्त साधून त्यांनी 'मोगरा फुलला' (१९७५) ही कादंबरी संत ज्ञानदेवाच्या जीवनचरित्रावर लिहिलेली आहे. ज्ञानेश्वरांच्या जन्मापासून ते त्यांनी समाधी घेतलेल्या पर्यंतची माहिती या कादंबरीत आहे.

विठ्ठलपंत, रुक्मिणी, कावेरी, ज्ञानेश्वर व भावंडे, जोशीकाका, भट्टदेव इत्यादी व्यक्तिरेखांचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. दांडेकरांनी ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा मोगरा कसा फुलला हे सांगितले आहे. या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा मोगरा कसा फुलला आणि त्याचा परिमल कसा दरवळत गेला, जीवनकार्य संपल्यावर शैवधर्मसंप्रदायाप्रमाणे त्यांनी आनंदाने संजीवन समाधी कशी घेतली याचे अतिशय उत्कट निवेदन गो. नी. दांडेकरांनी केलेले आहे.''[१७] या कादंबरीतून तत्कालीन समाजाचे दर्शन घडते. दांडेकरांनी ज्ञानेश्वरानंतर संत तुकाराम महाराजाच्या जीवनचरित्रावर 'तुका आकाशाएवढा' ही संतचरित्रपर कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत तुकारामाचा मित्र 'संतू जगनाडे' यांचे चित्रण आलेले आहे. तुकारामाचे वडील बोल्होबा, आई कनकाई, सावजीची पत्नी, तुकारामाची पहिली पत्नी व मुलगा हे सर्व एकापाठोपाठ एक मरण

पावतात. हे सर्व सहन करून तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर जाऊन राहतात व तेथे अनेक अभंग लिहितात. इंद्रायणीत बुडविलेले अभंग, रामेश्वर भट्ट हा त्यांचा झालेला शिष्य, शिवाजी महाराज-तुकारामाची भेट इत्यादी प्रसंगाचे चित्रण दांडेकरांनी सविस्तर केलेले आहे. शेवटी प्रचंड वावटळ येते व तुकारामाला घेऊन जाते. या दोन कादंबऱ्याप्रमाणेच दांडेकरांनी 'दास डोंगरी राहतो' ही कादंबरी संत रामदास स्वामीच्या जीवनचरित्रावर लिहिली आहे. या कादंबरीची सुरुवात 'रामदास लग्नमंडपातून' पळून गेलेला आहे, अशी असून त्याला वाटेत आईची आठवण येते. स्थळवर्णन, निसर्गवर्णन व तत्कालीन समाजाचे चित्रण या कादंबरीतून होते. दांडेकरांनी ज्ञानेश्वर-तुकाराम यांचे व्यक्तिमत्त्व जसे रेखाटले तसे रामदासाचे रेखाटले नाही. या कादंबऱ्यानंतर त्यांच्या 'पद्मा' व 'जगन्नाथपंडित' या संतचरित्रपर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

मृणालिनी जोशी यांनी संत मुक्ताबाईच्या जीवनाचा वेध घेणारी 'मुक्ताई' (१९७५) ही संतचरित्रपर कादंबरी लिहिली असून यामध्ये संताच्या भक्तिमार्गात कोणताही भेदभाव, जात, वंश, धर्म नसतो हे सांगितले आहे. तसेच त्यांच्या संत बहिणाबाईच्या जीवनावरील 'पताका' (१९७५) व समर्थ शिष्या वेण्णाबाईच्या जीवनावरील 'वेण्णास्वामी' (१९८९) या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. प्र.न. जोशी यांनी संत मीराबाई -'मीरा बावरी' (१९७६), संत गुलाब महाराजांच्या जीवनावर 'आंधळी गोफण' (१९९०), तुकाराम शिष्या बहिणाबाईच्या जीवनावर 'संत बहिणा' (१९७७), सत्पुरुष पंतमहाराज बाळेकुंद्री यांच्या जीवनचरित्रावर 'गगनगिरीचा योगी' (१९७६), संत चोखोबाच्या जीवनावर आधारित 'काय भुललासी वरलिया रंगा' (१९७९), स्वामी चक्रधरांच्या जीवनाचा वेध घेणारी 'सर्वज्ञ' (१९८१) इत्यादी संतचरित्रपर कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत.

अरुणा ढेरे यांची 'संत चोखामेळा' यांच्यावर लिहिलेली 'महाद्वार' ही संतचरित्रपर कादंबरी आहे. वारकरी संप्रदायात जातिभेद होता. त्याचा चटका संत चोखामेळाला बसला. तरीही त्यांनी कष्टपूर्ण जीवन जगत विठ्ठलाची केलेली भक्ती, त्याचे विठ्ठलमय झालेले जीवन इत्यादीचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे.

लीला दीक्षित यांची 'चंदनवेल' (१९६५) ही संतचरित्रपर कादंबरी प्रकाशित झाली असून ती कान्होपात्रा या गणिका स्त्रीच्या जीवनावर लिहिली आहे. तिला विठ्ठलदर्शनाची लागलेली आंतरिक ओढ व तिच्या वाट्याला आलेले खडतर जीवन यांचे चित्रण या कादंबरीत आले आहे. शेवटी विठ्ठलावर निष्ठा ठेऊन ती पंढरपुरास जाते. कान्होपात्रेच्या व्यक्तिरेखेबद्दल बोलताना लीला दीक्षित यांनी व्यक्त केलेले मत विचारात घेण्याजोगे आहे. ''कान्होपात्रेचे विलक्षण जीवन मी पाहिले आणि मी अस्वस्थ झाले. इतर संत कवयित्रींना कोणाचा ना कोणाचा मानसिक आधार होता. कान्होपात्रेला कोणाचाच आधार नव्हता. वेश्याकुळी तिचा जन्म, मानहानीचे जीवन, पण तिच्या निष्ठा इतक्या जाज्वल्य की ती फार मोठी झाली. संत होऊन गेली. केवढा हा विलक्षण प्रवास ज्ञानेश्वर प्रणीत आध्यात्मिक लोकशाहीत मला कान्होपात्रेच्या रुपाने कळस दिसला''. [१८] अशाप्रकारे दीक्षित यांनी कान्होपात्रेचे चरित्र चित्रित केले आहे.

'लीला गोळे' यांनी सर्वाधिक मराठीत संत चरित्रपर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांची 'आनंदओवरी' (१९८८) ही बहिणाबाईच्या जीवनावरील कादंबरी आहे. बहिणाबाईनी प्रतिकूल परिस्थितीवर केलेली मात व समाजातील स्त्रियांना केलेले मार्गदर्शन इत्यादीचे चित्रण या कादंबरीत येते. बहिणाबाईबद्दल वाचकाला आत्मियता वाटते. त्यांनी संत एकनाथांच्या जीवनावर आधारित 'शांतिब्रह्म' (१९८३), संत नामदेवांच्या 'नामाचा गजर' (१९८४), अक्कलकोट स्वामीच्या जीवनावर 'श्रीस्वामी राजा' (१९९२), गजानन महाराजाच्या जीवनावर 'शेगावीचा योगिराणा' (१९९०) व 'ज्ञानराज माऊली' (१९८४) इत्यादी संतचरित्रपर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

विद्या सप्रे-चौधरी यांची 'कृष्णमय' (१९९०) ही मीराबाईच्या जीवनावर आधारित कादंबरी आहे. या कादंबरीत मीराबाईचे चित्रण लालित्यपूर्ण भाषेत केले आहे.

'दिग्विजय' (१९९०) ही मुक्ता केणेकर यांची स्वामी विवेकानंदच्या जीवनावर आधारित चरित्रात्मक कादंबरी असून स्वामीच्या जीवनातील अनेक प्रसंगाचे चित्रण केलेले आहे.

जोत्सना देवधर यांची 'उत्तरयोगी' (१९७३) ही अरविंदाच्या जीवनावर लिहिलेली चरित्रात्मक कादंबरी असून तुरुंगातून सुटलेल्या अरविंदाच्या जीवनात झालेल्या बदलाचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. तसेच त्यांची 'रमाबाई' (१९८०) ही कादंबरी रमाबाईच्या जीवनातील प्रसंगावर आधारित आहे.

मृणालिनी देसाई यांची 'पुत्र मानवाचा' (१९६९) ही कादंबरी मा. गांधीजीच्या जीवनावर लिहिली आहे. चंपारण्यातील नीळ कामगार व राजकीय चळवळ इत्यादीचा तपशील या कादंबरीत चित्रित केलेला आहे.

शांताबाई गोखले यांची 'वृंदावन' ही (१९६९) ही चरित्रपर कादंबरी असून ती स्वा. सावकर यांची धर्मपत्नी 'माई' यांच्या जीवनावर लिहिलेली आहे.

शुभांगी भडभडे यांची 'विनोबा भावे' यांच्या जीवनावर 'भौमर्षी' (१९९८) ही चरित्रात्मक कादंबरी प्रकाशित झाली असून या कादंबरीत समाजाने विनोबा भावे या महापुरुषाचा आदर्श घेण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले आहे.

अलीकडेच डॉ. आनंद यादवांची 'लोकसखा ज्ञानेश्वर' ही वास्तवादी चरित्रात्मक कादंबरी नोव्हेंबर २००५ मध्ये प्रकाशित झाली असून ती संत ज्ञानदेवांच्या जीवनचरित्रावर आधारित आहे. संत ज्ञानदेवांच्या जन्मापासून ते समाधी घेतल्यापर्यंतच्या काळातील अनेक प्रसंगाचे चित्रण या कादंबरीत चित्रित केले आहे. तसेच ज्ञानदेवाचे आई-वडील, भावंडे, रुक्मिणी, सिद्धोपंत इत्यादी व्यक्तिरेखांचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. तसेच त्यांची 'संतसूर्य तुकाराम' ही संत तुकारामाच्या जीवनचरित्रावर आधारित संतचरित्रपर कादंबरी नुकतीच प्रकाशित झाली आहे.

त्यानंतर अनेक मराठी संत चरित्रपर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या या संदर्भात मराठीचे प्राध्यापक व समीक्षक डॉ. म. वि. गोखले - 'महाभागवत' (एकनाथ), डॉ. शे. दे. पसारकर - 'वेलु गेला गगनावरी' (संत ज्ञानेश्वर), श्री. अशोक देशपांडे-'आम्ही पायरीचे चिरे' (संत नामदेव), 'निळा झाला पावन'(संत निळोबाराय) 'झाली युगे अठ्ठावीस' (भक्त पुंडलिक), विद्या सप्रे-'अर्घ्यदान' (इंदिरा गांधी), डॉ. वि.य. कुलकर्णी -'अनाथांचा नाथ' (एकनाथ) व 'सोन्याचा पिंपळ' (ज्ञानेश्वर), रंगनाथ पठारे -'वैकुंठाची माती' (तुकाराम /

आवली) इत्यादी संत चरित्रात्मक कादंबऱ्या मराठीत लिहिल्या गेल्या. या सर्वच संतचरित्रपर कादंबऱ्यांचा आढावा घेणे आवश्यक नसल्यामुळे काही महत्त्वपूर्ण मोजक्याच कादंबऱ्यांच्या येथे उल्लेख केलेला आहे.

## २.७ समारोप :

मराठी वाङ्मयात कथा, कविता, नाटक इत्यादी प्रमाणेच कादंबरी हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. प्रस्तुत प्रकरणात मराठी कादंबरीचा उदय, व्याख्या, घटक इत्यादीचे सविस्तर विवेचन केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात नवनवे वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. त्यातीलच एक प्रवाह म्हणजे चरित्रात्मक कादंबरी हा होय. लेखकांनी भूतकाळातील प्रेरणा घेऊन पुराणातील किंवा इतिहासातील व्यक्ती व घटना निवडून चरित्रात्मक कादंबरीचे लेखन केले. पुढे चरित्रात्मक कादंबरीच्या ऐतिहासिक, पौराणिक व संतचरित्रपर अशा शाखा निर्माण झाल्या.

चरित्रात्मक कादंबरीची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणजे संतचरित्रपर कादंबरी होय. मराठीत आजवर चाळीसच्या आसपास संतचरित्रपर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यामध्ये ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, चोखोबा, वेण्णाबाई, जनाबाई, मुक्ताई, कान्होपात्रा, बहिणाबाई इत्यादी संताच्या जीवनचरित्रावर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तसेच आधुनिक काळातील गुलाब महाराज, गजानन महाराज, पंत महाराज बाळेकुंद्री, अक्कलकोट स्वामी इत्यादीच्या जीवनचरित्राचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळानंतर संतचरित्रात्मक कादंबरी हा प्रवाह उदयास आला आणि तो अल्पावधीतच लोकप्रिय ठरला. यानंतर 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमधील आशयसूत्राचा विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहे.

## संदर्भ


१. संत, जान्हवी, 'कादंबरी : एक वाङ्मयप्रकार', मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९७१, पृ. क्र. ८.

२. देशपांडे , मा. का., 'साहित्य साधना', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६१, पृ. क्र. १५३.

३. कुलकर्णी , श्री. मा., 'कादंबरीची रचना', उन्मेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती- १९५६, पृ. क्र. १५.

४. जाधव, रा. ग., 'मराठी विश्वकोश, खंड-३', संपा.- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सांस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. क्र. ५९९.

५. प्रिस्टले, जे. बी. (कादंबरी : एक वाङ्मय प्रकार - जान्हवी संत) उ. नि. पृ. क्र. १२ वरून उद्घृत.

६. डेव्हिड, सिसिल, (कादंबरी : एक वाङ्मय प्रकार - जान्हवी संत) उ. नि, पृ. क्र., १२ वरून उद्घृत.

७. हेन्री, जेम्स, (कादंबरी : एक वाङ्मय प्रकार - जान्हवी संत) उ. नि, पृ. क्र. १२, वरून उद्घृत.

८. नेमाडे, भालचंद्र, 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, सप्टेंबर, १९९०, पृ. क्र. १९८.

९. पेंडसे, श्री. ना., 'एक मुक्त संवाद : उद्याच्या कादंबरीकाराशी' मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३, पृ. क्र. ७.

१०. संत, जान्हवी, 'कादंबरी : एक वाङ्मयप्रकार', उ. नि पृ. क्र. १५.

११. तत्रैव, पृ. क्र. १२७.

१२. कुलकर्णी, द. भि., 'तिसऱ्यादा रणांगण', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. क्र. ४१.

१३. कोत्तापल्ले, नागनाथ, 'प्रतिष्ठान कादंबरी समीक्षा विशेषांक', मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, जाने. १९८१, पृ. क्र. १३०.

१४. पगारे, हरिभाऊ, 'युग प्रर्वतक' सुधीर प्रकाशन, गणेशनगर बोरगाव (मेघे), जि. वर्धा. प्रथमावृत्ती, २००१, (प्रस्तावना-केशव मेश्राम), पृ. क्र. ७

१५. कोत्तापल्ले, नागनाथ, 'प्रतिष्ठान कादंबरी समीक्षा विशेषांक', उ. नि. पृ. क्र. १२७

१६. तत्रैव, पृ. क्र. १८

१७. बांदिवडेकर, चंद्रकांत, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'ऑक्टो-डिसें., १९७९, पृ. कृ. ५५.

१८. दीक्षित, लीला, 'स्त्री साहित्याचा मागोवा : खंड २', साहित्यप्रेमी भगिनीमंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. क्र. १४८-१४९